# देगलूर महाविद्यालयातील उपप्राचार्य गोविंदवार यांचा सेवागौरव संपन्न

देगलूर (वार्ताहर) - अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य निवृत्तीनाथ गोविंदवार हे दि. ३० सप्टेंबर रोजी नियत वयोमानानुसार ३४ वर्षे सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झाले आहेत.

शांत स्वभावाचे, मनमिळावू, विद्यार्थीप्रिय, मैत्री जपणारे व संघटन कौशल्याने व्यक्ती जोडणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून ते सर्वपरिचित आहेत. त्यांच्या सेवानिवृतीनिमित्त महाविद्यालयात सेवा गौरव कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोहन खताळ होते.

व्यासपीठावर अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर होते तर व्यासपीठावर सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य जनार्दन चिद्रावार, रवींद्रअप्पा द्याडे, देवेंद्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह जुक्टाचे पदाधिकारी मुकुंद बोकारे यांनी त्यांना भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवचरण गुरूडे तर आभार एम.एम. चमकुडे यानी मानले.

Scanned with OKEN Scanner